हंगामी पिके व इतर भरपुर माहितीसह

सप्टेंबर २०११

असेल सोबत मासिक

# गोडवा शेतीचा

तर होईल विकास शेती आणि शेतकऱ्यांचा




शेती व शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय बाळगणारे मासिक

* पुणे * वर्ष ७ वे * अंक ८ वा




अवश्य भेट द्या
डेअरीविषयक भव्य प्रदर्शन
कात्रज डेअरी एक्स्पो
पुणे,१०ते १२ डिसेंबर २०११

















व सोयाबिनवरील किडींचे आणि रोगांचे
न

वड करण्यापूर्वी शेतात उन्हाळी नांगरणी
व ... ची बिजे, तंतू तसेच बुरशीची फळे इत्यादीचा उष्णतेमुळे तसेच जमिनीत खोल गाडल्या जाऊन नाश होतो.

२) सोयाबिनची पेरणी जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत संपवावी.

३) शक्यतोवर प्रमाणित बियाणे वापरावे.

४) पेरणीपूर्वी बुरशीनाशकाची किंवा जैविक बूरशी जसे ट्रायकोडर्माची बीज प्रक्रिया करावी.

५) सोयाबीन पिकास शिफारशीप्रमाणे रासायनिक खताची मात्रा द्यावी. नत्राचा वापर जास्त झाल्यास रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

६) पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत शेत तणमक्त ठेवावेत. बांधावर असणाऱ्या पुरक वनस्पतींचा नाश करावा. प्रथमावस्थेत अत्यल्प प्रमाणात असलेली मरग्रस्त/ रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत.

७) सोयाबीन पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे व आवश्यकतेनुसार रोगाची तिव्रता व पिकाची अवस्था पाहून बुरशीनाशकाची फवारणी करून रोगाचे व्यवस्थापन करावे.

८) पक्षांसाठी काठ्यांचे पक्षी थांबे तयार करावेत. अंडी पुंज व लहान अळ्या वेचून नष्ट कराव्यात.

९) पिकांमध्ये लिंगाकर्षण सापळे/ प्रकाश सापळे लावावेत.

१०) सोयाबिनच्या पिकानंतर भुईमुगाचे पिक घेऊ नये.

११) पिक फेरपालट करावी.

***

## बहिणाबाई जयंती निमित्त बहिणाबाई काव्य सादरीकरण स्पर्धा

बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट आणि भवरलाल ॲण्ड कांताबाई मल्टीपर्पज फाउंडेशन संयुक्त उपक्रम

**जळगाव दिनांक २ (प्रतिनिधी)–** खान्देश कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या १३२ व्या जयंती निमित्त महाविद्यालयीन- विद्यालय पातळीवर २४ ऑगस्ट रोजी बहिणाबाई चौधरी यांच्या काव्य सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बहिणाबाईंच्या कवितांमधील मूल्य युवा पिढीपर्यंत पोहचावे या उद्देशाने बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट व जैन इरिगेशन सेवाभावी संस्था भवरलाल ॲण्ड कांताबाई मल्टीपर्पज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने ही स्पर्धा घेण्यात आलेली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कुठलेही शुल्क आकारले जाणार नसून अधिकाधिक महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थीनींनी यात सहभागी व्हावे यासाठी प्रत्येकाला संधी दिली जाणार आहे. विजयी स्पर्धकांना प्रतम पारितोषीक रूपये २००१/-, द्वितीय रू. १५०१/-, तृतीय रू. १००१/-, व उत्तेजनार्थे रू. ७०१/- रोख व प्रमाणपत्र दिले जाईल. असे आयोजकांतर्फे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व इच्छुक स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल.

आसोदा येथील माहेर आणि जुने जळगाव येतील सासर असलेल्या बहिणाबाईंच्या साहित्य कृतीने मराठी साहित्याला एक वेगळी उंची प्राप्त करून दिली आहे. त्यांच्या जात्यावरच्या ओव्या, कविता, गाणी, त्यांच्या काव्यातील साधेपणा, सोपी अन् हृदयाला भिडणारी भाषा, भावनांमधील प्रांजळपणा, प्रत्येक शब्दाआड रुजलेला माणुसकीचा ओलावा, निसर्ग, पशु, पक्षी, शेती भाती आणि कष्टांवर असलेल्या अतूट बंधामुळे बहिणाबाईंची कविता अगदी सहजरीत्या प्रत्येक घराघरात पोहचली आहे.

बहिणाबाईंच्या साहित्य संस्कृतीचे जतन व चिंतन स्मरण रहावे या उद्देशाने बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट, जळगावची स्थापना जैन चॅरिटीज व जैन कुटुंबियांच्या पुढाकाराने करण्यात आलेली आहे. यात बहिणाबाईंचे साहित्य, वाङमय आणि काव्य लेखन कायमस्वरूपी जतन करून ते समाजातील प्रत्येकाला उपलब्ध करून देणे व त्यांचा दैनंदिन वापरातील वस्तूंचा संग्रह करणे, त्यांच्या साहित्याचा तौलानिक अभ्यासकांसाठी मदत करणे, बहिणाबाई संबंधी दस्ताऐवज यांचे उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे, याशिवाय कवि संमेलने, साहित्य संमेलने व काव्य स्पर्धेचे आयोजन करणे इ. ट्रस्टचे उद्देश आहेत. मराठी साहित्यात बहिणाबाईंचे असलेले अढळ स्थान लक्षात घेऊन सन २००३ पासून राज्यपातळीवर कवयित्री बहिणाबाई पुरस्काराचे आयोजन नित्यनियमाने केले जात आहे.

***

# पारंपारिक ऊस शेतीकडून प्रगत तंत्रज्ञानावरील ऊस शेतीकडे

श्री. बी. डी. जडे, वरिष्ठ कृषीतज्ञ
जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि. जळगाव
मोबा. ९४२२७७४९८१

ऊस हे महाराष्ट्रातील प्रमुख नगदी पिक आहे. राज्यात या पिकाचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक बदल घडून आणलेले आहे. राज्यात साधारणपणे ८ ते १० लाख हेक्टर ऊस पिकाखाली क्षेत्र असते, राज्याची ऊस पिकाची उत्पादकता ७४ मेट्रिक टन/ हेक्टर एवढी आहे. राज्यात ऊसाचे संपूर्ण क्षेत्र १०० टक्के बागायती आहे. राज्यात सर्वच सिंचनाची स्त्रोतामुळे क्षेत्र १६.५ टक्के आहे. म्हणजेच उर्वरीत ८३.५ टक्के क्षेत्र कोरडवाहूच आहे. अशा परिस्थितीत राज्यात ऊस पिकासाठी सर्रास पाटपाणी, मोकाट सिंचन पद्धतीचा ऊस उत्पादक शेतकरी उपयोग करीत आहेत. खूप जास्त पाणी वापरूनही ही उसाचे उत्पादन वाढतांना दिसत नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये ऊस पिकासाठी खुप पाण्याची गरज असल्याचा गैरसमज आहे. हा गैरसमज दूर होण्याची खूप गरज आहे. या पिकासाठी होत असलेल्या पाण्याच्या अतिरेकामुळे जमिन अधिक क्षारयुक्त, चिबड होत चाललेल्या असून त्याचा परिणाम ऊसाच्या उत्पादनावर होत आहे. अधिक उत्पादनासाठी जमिनीत केवळ वाफसा अवस्था असणे गरजेचे असते. ज्यामुळे पिकांच्या मुळांच्या कार्यक्षेत्रात पाणी व हवाचे संतुलन राहिल्याने दिलेल्या रासायनिक खतांचे शोषण ही सुलभ होते. हे केवळ ठिबक सिंचन तंत्राच्या वापराने शक्य होते.



राज्यात १९८७-८८ पासून ठिबक सिंचन तंत्राचा वापर सुरू झाला असून ह्या तंत्राचा आता मोठ्या प्रमाणात वापर सुरु आहे. सुरूवातीस फळबागासाठी झाला. त्यानंतर भाजीपाला, फुलशेतीसाठी होऊ लागला. आता तर कापूस आणि ऊस सारख्या नगदी पिकासाठीही ठिबक सिंचन तंत्राचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. शेतातील पाण्याची टंचाईची समस्या, वीजेच्या लपंडावाची समस्या, मजूरांच्या टंचाईची समस्या, मजूरांच्या टंचाईची समस्या ह्यावर ठिबक तसंचन रामबाण उपाय ठरत आहे. ऊसासारख्या जवळच्या अंतरावर वाढणाऱ्या पिकासाठी ठिबक सिंचन तंत्राचा उपयोग करतांना इनलाईन (जैन टर्बो ॲक्यूरा किंवा जैन टर्बो लाईन) चा उपयोग करावा. त्यामुळे आता उस शेती करतांना अधिक डोळसपणे करण्याची गरज आहे. अधिक क्षेत्र लागवडीखाली न आणता कमी क्षेत्रात अधिक उत्पादन कसे मिळवता येईल यावर गांभीर्याने विचार करण्याची, अभ्यास करण्याची गरज आहे. सध्या एकरी २८ ते ३० मे.टन प्रति एकरी उसाचे उत्पादन आहे. ह्या तंत्राच्या वापराने किमान दिड ते दुप्पट उत्पादन मिळणे सहज शक्य आहे. ऊसाच्या पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी सध्याची पारंपारीक ऊस शेतीमध्ये बदल होणे गरजेचे वाटते. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून ऊसाचे उत्पादन वाढवीणे सहज शक्य आहे. राज्यात काही शेतकरी प्रगत तंत्रज्ञानाचा उसासाठी वापरही करीत आहे. त्यांचे एकरी १०० मे. टनाहून अधिक उत्पादनही मिळाले आहे. ऊसाचे एकरी १०० टन उत्पादन मिळू शकते. अशा राज्यातील शेतकऱ्यांनी अनुभव घेतलेला आहे. ह्याचे अनुकरण मोठ्या प्रमाणावर होणे आता काळाची गरज आहे. काळाच्या प्रवाहाप्रमाणेच आता पारंपारीक शेतीमध्ये बदल होणे गरजेचे वाटते. दिवसेदिवस पिकाचा उत्पादन खर्चही वाढत आहे. यामुळे अधिक आर्थिक नफा मिळत नाही. त्यामुळे ऊस शेतीमध्ये वापरण्यात येणारे घटक पाणी, रासायनिक खतांचा अतिशय काटेकोरपणे वापर करणे महत्वाचे ठरते.

अलीकडे तामीळनाडू राज्याप्रमाणेच आपल्या राज्यातही ऊसासाठी भूपृष्ठ अंतर्गत ठिबक सिंचन (सब सरफेस ड्रिप) पद्धतीचा उपयोग काही साखर कारखान्यांच्या प्रक्षेत्रावर व काही प्रगतशील ऊस उत्पादक शेतकरी उत्सुकतेने वापर करीत आहेत. सब सरफेस ड्रिप तंत्राचा ऊसामध्ये वापर वाढल्याने ऊसाची तोडणी यांत्रिक पद्धतीने करणे सहज शक्य होईल व ऊस तोडणी मजुरांचा प्रश्न सुटू शकेल. तसेच ऊसाचे ७ ते ८ खोडवेही घेणे सहज शक्य होणार आहे.

पारंपारिक ऊस शेती आणि प्रगत तंत्रावरील शेती यामध्ये काय बदल अपेक्षित आहेत किंवा त्यातील तुलनेचा अभ्यास सविस्तर मांडला आहे.

| तपशील | पारंपारिक ऊस शेती | प्रगत तंत्रावरील ऊस शेती |
|---|---|---|
| माती परिक्षण | शक्यतोवर करत नाहीत | माती परीक्षण करावे(जमिनीचा सामू, विद्युत वाहकता,सेंद्रिय कर्ब मुख्यव सुक्ष्म अन्नद्रव्ये) |
| पूर्व मशागत | नांगरटी आणि वखरटी, जमिन भुसभुशीत केली जात नाही | नांगरटी, वखरटी, रोटॅवेटर ने जमिन भुसभुशीत करावी. |
| जाती | उपलब्धतेनुसार वापरले जाते. | अधिक उत्पादन देणाऱ्या जाती निवडाव्यात. |
| बेणे | तीन डोळ्यांचे बेणे वापरतात. | एक किंवा दोन डोळ्यांचे बेणे वापरतात. |
| बेणे मात्रा | ३ ते ४ टन/ एकर वापरतात. | १ ते २ टन/ एकर मध्ये शक्य होते. |
| बीज प्रक्रिया | शक्यतोवर करीत नाही | बीज प्रक्रिया करावी. (बुरशीनाशक व किटकनाशक यांची) |
| सेंद्रिय खते | उपलब्धतेनुसार शेणखतात वापरतात. | शेणखत, प्रेसमड कंपोस्ट, निंबोळी पेंड मिश्रण करून वापरावे. |
| जिवाणू खते | वापर करीत नाहित. | ॲसीटो बॅक्टर, पी.एस.बी, पोटॅश जीवाणू खतांचा वापर करावा. |
| लागवड पद्धत | सरी, वरंबा पद्धत | रूंदसरी पद्धत (४ ते ५ फूट) किंवा जोड ओळ पद्धत |
| पाणी व्यवस्थापन | मोकाट सिंचन पद्धतीने पाण्याचा वापर केला जातो. | ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा |
| पाणी वापर | असमान पसरते. | एकसमान दिले जाते. |
| पाण्याच्या पाळ्या | १० दिवसांच्या अंतराने ३० ते ३५ पाळ्या दिल्या जातत. | ठिबक सिंचनचा वापर रोज करावा. |
| पाणी वापर कार्यक्षमता | ३० ते ४० टक्के | ९० ते ९५ टक्के |
| पाण्यचा वापर | २५० सेमी | ११०-१२० सेमी |
| पाण्याची बचत | होत नाही | ५० ते ६० टक्के बचत होते |
| जमिनीत वाफसा | कायम शक्य नाही | ठिबक मध्ये कायम वाफसा राहतो. |
| एका पिकासाठी सिंचन खर्च | साधारणपणे ५०००रू. | ४५००रू (ठिबकाची घसारा किंमत) |
| जमिन क्षारयुक्त | पाटपाणी अधिक होतात. | ठिबकाने होत नाही. |
| सिंचनासाठी लागणारा वेळ | मोकाट सिंचन पद्धतीने अधिक वेळ लागतो | ठिबक सिंचन पद्धतीने कमी वेळ लागतो. |
| पिकास पाण्याचा ताण | पिकास कमी अधिक ओलाव्यामुळे ताण बसतो | जमिनीत वाफसा कायम असल्यामुळे पिकास ताण बसत नाही. |
| रासायनिक खते व्यवस्थापन | मजूरांद्वारे दिली जातात. | ठिबक सिंचन पद्धतीमधून वापर करावा (फर्टिगेशन) |
| खताची कार्यक्षमता | कमी मिळते ४०-५० टक्के | अधिक मिळते. ८०-९० टक्के |
| खतांची बचत | बचत होत नाही | २५ ते ३० टक्के बचत होते. |
| सुक्ष्म अन्नद्रव्ये | वापर करीत नाहित | सुक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा. |
| खते वापराचा कालावधी | १२० दिवसांपर्यंतच | खतांचा वापर २५०-२६० दिवसांपर्यंतच करावा. |
| जमिन पाणी पिक यांचा परस्पर संबंध | परस्पर संबंध राखला जात नाही | परस्पर संबंध राखला जातो |
| विद्राव्य खतांची फवारणी | करीत नाही | विद्राव्य खतांची फवारणी करावी. |
| वीजेचा वापर | अधिक होतो. | कमी होतो. |

| | | |
|---|---|---|
| बाळ बांधणी | करीत नाही | बाळ बांधणी करावी |
| पिक संरक्षण | करीत नाही | गरजेनुसार किटक नाशक व बुरशीनाशकांची फवारणी करावी. |
| सिंचन पद्धती | पाणी वेगाने दिले जाते | पाणी थेंबा थेंबाने दिर्घकाळ दिले जाते. |
| | पाणी जमिनीस दिले जाते | पाणी ऊस पिकाला दिले जाते |
| उगवण | उशीराने होते<br>गॅप जास्त आढळतात | लवकर होते. उगवण छान होते.<br>गॅप शक्यतो आढळत नाही. |
| पिकाची वाढ | कमी, एकसमान होत नाही. | जोमदार एकसमान वाढ होते. |
| फूटव्याची संख्या | कमी आढळते. | अधिक मिळतात. |
| पानांचा रंग | कमी अधिक ओलाव्यामुळे हिरवा, पोपटी पिवळसर असतो. | गर्द हिरवा असतो. |
| पेर कांड्यांची लांबी | कमी,अधिक (एक समान नसते) | एक समान लांबी मिळते |
| पेर कांड्यांची जाडी | कमी आढळते | अधिक मिळतात. |
| उसाची उंची | कमी सर्वसाधारण असते | अधिक मिळते, उस उंच वाढतो. |
| मुळांची कार्यक्षमता | जमिनीतील कमी–अधिक ओलाव्यामुळे कमी कार्यक्षम असतात. | अधिक कार्यक्षम असतात. |
| ऊसाचे वजन | वजन कमी भरते | ऊसाचे वजन जास्त भरते. |
| सरासरी उत्पादन मे.टन/एकर | ३० ते ४० टन मिळते | ८० ते १०० टन मिळणे शक्य होते |
| एकरी आर्थिक नफा | कमी मिळतो | आर्थिक नफा अधिक मिळतो. |

वरील अभ्यासावरुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी पारंपारिक ऊस शेतीमध्ये बदल करतांना अधिक उत्पादन देणाऱ्या जातींच्या बेण्याची निवड करून त्यावर बिजप्रक्रिया करणे गरजेचे आहे. लागवडीच्या पद्धतीतही बदल करणे गरजेचे आहे. लागवड करतांना उत्पादन खर्च कमी होण्यासाठी तीन डोळ्यांऐवजी एक किंवा दोन डोळे बेणे वापरल्याने बेणे खर्चात बचत होईल. ऊस उत्पादनामध्ये पाणी व्यवस्थापन आणि रासायनिक खतांचे व्यवस्थापन या दोन महत्वाच्या बाबी आहेत. या घटकांची कार्यक्षमता अधिक मिळविण्यासाठी आणि त्यांच्या काटेकोर वापर होण्यासाठी ठिबक सिंचन तंत्राचा वापर करणे ही काळाची गरज आहे. ***


**१३ दिवस अण्णांनी उपोषण केले .....?**

**कारण सरकारने भ्रष्टाराचा नोकरशाही,राजकारणी,जनतेसह तेरावा करावा म्हणुन तेरा दिवस अण्णांना उपोषण करावे लागले, सरकार चा तेरावा नाही बरका... ?**



# संकरीत बी. टी. कापूस सांभाळा ६० व्या दिवसापासून ते १६५ दिवसापर्यंत

व्ही.बी.पाटील, एस.एस.सी (कृषी)
वरिष्ठ व्यवस्थापक, कृषी संशोधन व प्रशिक्षण
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लिमीटेड, जळगाव
मो. नं. ९४२२७७६७३२



महाराष्ट्र, विदर्भ, खानदेश, मराठवाडा आणि नगर नाशिक जिल्ह्यांचा काही भाग असे क्षेत्र संकरीत बी. टी. कापूस वाणांनी व्यापले आहे. कापसाला मिळणारा आकर्षक भाव, कमी मुदतीचे पिक, बी.टी. तंत्रज्ञान आणि मदतीस ठिबक सिंचन प्रणालीचा वरदहस्त, या सर्व कारणांमुळे पुर्व हंगामी ठिबकावर कापूस लागवड करणारा शेतकरी समाधानी आहे.

गेल्या २-३ वर्षातील अनुभव, उत्पादनातील वाढ लक्षात घेता कापसाखालील क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. परंतु केवळ जास्त क्षेत्र कापसाखाली आणून चालणार नाही. पुर्व हंगामी जुजबी पाण्यावरच ठिबक पद्धती खाली कापूस लागवड झाली पाहिजे तरच उत्पादन मिळू शकते. जिरायत जुन- जुलै महिन्यातील लागवड एकरी ३-४ क्विंटल, ३००-४०० किलोपेक्षा जास्त कापूस उत्पादन देवूच शकत नाही. एकरी १० क्विंटल पेक्षा कमी उत्पादन येत असेल त्यांनी कापूस लागवड करू नये. त्यांनी उडीद, मूग, ज्वारी, बाजरी, तीळ या पिकांकडे वळावे. आज मितीला ज्वारी आणि तीळ तसेच उडीद-मुग या पिकांना मोठी मागणी वाढत आहे. बाजारभाव पण चढत आहे.

ज्या शेतकऱ्याचे कापूस पीक ६० दिवसाचे वयापासून १३०-१३५ दिवसापर्यंत अतिदक्ष राहिलेच पाहिजे. अन्यथा उत्पादनात फटका बसणार आहे. महाराष्ट्राची उत्पादकता हेक्टरी ३५१ किलो रुई एवढीच तुटपुंजी आहे. भारताचा कापूस उत्पादनाचा जगात २१ टक्के हिस्सा आहे. पंजाब, तमिळनाडू या राज्याच्या उत्पादकता या बाबतीत आघाडीवर आहे. चीनमध्ये हेक्टरी ११०० किलो रुई मिळते. त्या खालोखाल ऑस्ट्रेलिया, ब्राझील यांचा नंबर लागतो. हेक्टरी उत्पादकतेबाबत गंभीर/ सतर्क राहिलाच पाहिजे तरच आपली धडगत आहे. अन्यथा कापूस आयात झाल्यास पुन्हा भाव गडगडतील.

**खत व्यवस्थापन:-**

पीक ६० दिवसाचे असल्यापासून १०० दिवसापर्यंत दर ४थ्या दिवशी खालीलप्रमाणे खत व्यवस्थापन वेळापत्रक सांभाळावे.

* ६० ते ७५ दिवस- एकरी १२:६१:०-३ किलो अधिक युरिया १.५ किलो अधिक पोटॅश १ किलो ही खते व्हेन्चुरीतून २५-३० मिनीटांत सोडावी. आठवड्यातून दोनदा खते सोडावीत.

* १०० दिवस ते १३० दिवस (दर ४ दिवसांनी) युरिया ३ किलो अधिक पोटॅश (पांढरा) ३ किलो एकरी याप्रमाणे ठिबकामधून सोडावेत.

* विद्राव्य खत फवारणीसाठी ६०-१०० दिवस ३-४ वेळा, १२:६१:०-२ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात ही फवारणी ३-४ वेळा करावी.

**किटकनाशक फवारणी:-**

* पिक ६० ते ९० दिवसांच्या कालावधीत- रोगार किंवा मेटासिस्टॉक्स किंवा कान्फिडॉर किंवा अॅक्टारा यापैकी कोणतेही एक किटकनाशक २-३ मि.ली. प्रती लिटर पाणी या प्रमाणात २-३ वेळा फवारणी करावी. बुरशीसाठी प्रति लिटर १ ग्रॅम बाविस्टीन मिसळावे.

* पिक ९० ते १३० दिवसांपर्यंत असियमायफ्रीड किंवा अॅसिफेट किंवा ट्रायझोफॉस प्रती लिटर पाण्यातून २-३ मि.ली. औषध फवारणी करावी.

**पाणी व्यवस्थापन:-**

पीक ११०-१२० दिवसांचे असताना साधारणत: सप्टेंबर मध्यान्हानंतर दररोज ठिंबक एक ते दिड तास नियमीत चालवावे. प्रति झाड प्रति दिनी ६-७ लिटर पांणी गरज आहे. ठिबक नोव्हेंबर अखेरपर्यंत चालू ठेवावेत.


वरिल वय (६० ते १३० दिवस) अत्यंत संवेदनशील कालावधी आहे. दक्ष रहा अन्यथा पश्चाताप करण्याची वेळ येईल.

***

जनावरांच्या रक्तावर जसे जळू रक्त पिवुन जगतात तसे काही व्यावसायीक शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेतात व शोषण करतात ,अशांना सापडल्यास कायद्याने कडक दंड असावेत .

# जैन हिल्स येथे पोळा सण उत्साहात साजरा

जळगाव दि.२८ (प्रतिनिधी) वर्षभर शेतात राबून आपल्या मालकाचे पोट भरण्याबरोबरच देशाच्या सर्वांगीण विकासात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या बैलांना पोळ्याला देवस्वरूप मानून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करणे म्हणजे पोळा हा सण होय. पुढील वर्षाच्या पोळ्यात आपल्या सर्व शेतीसाईटचे बैलं, सालदार सहभागी करण्यात येऊन तो अधिक उत्साहाने साजरा केला जाईल. असे विचार जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत भवरलालजी जैन यांनी व्यक्त केले. विदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीत जैन इरिगेशनच्या जैन हिल्स येथे आज पोळ्याचा सण पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



जैन हिल्स येथे सुमारे २० बैल जोड्या आहेत. सकाळपासूनच सालदार बैलांच्या सेवेत, त्यांना आकर्षकपणे सजविण्यात गुंतले होते. आरंभी बैलांना स्वच्छ धुवून त्यांची शिंगे आकर्षकपणे रंगविण्यात आली. बैलांच्या अंगावर रंगीबेरंगी झुली चढवून आणि चंगाळे, घुंगरे आदी घालून मिरवणूक काढण्यात आली. या सोबत लाडक्या बैलांची ढोल वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढली. यासाठी नंदूरबार येथील नानू पावरा यांच्या वाद्यगटासह, सावखेडा येथील पारंपरिक वाद्य वाजविणाऱ्या वाद्यवृंदास खास पाचारण करण्यात आले होते. यावेळी पारंपरिक वाद्याच्या ठेक्यात नृत्यासोबत विविध कसरती देखील मोठ्या कल्पकतेने सादर केल्या होत्या. बैलगाडी, रेल्वेगाडी, मानवी मनोरे आदींचा समावेश होता. विदेशी पाहुणे या कसरती पाहून भारावले. ढोल व अन्य वाद्यांच्या गजरात जैन इरिगेशनचे संस्थापक, उपाध्यक्ष अशोक जैन, व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन, विपणण संचालक अतुल जैन यांच्यासह ब्रिटन, टांझानिया, लंडन, अमेरिका या देशांच्या पाहुण्यांनी देखील वाद्याच्या गजरात ठेका धरला होता. आंब्याच्या डहाळ्या, फुलांच्या, नारळाचे तोरण तोडून पोळा फोडला गेला. सालदारांनी ढोल ताशांच्या निनादात बैलांना मिरवत आणले. प्रारंभी भवरलालजी जैन, अशोक जैन आणि जैन परिवारातील सुष्नांनी बैलांची पूजा केली. पोळा कसा साजरा होतो हे बघण्यासाठी अनुभूती निवासी शाळेचे तसेच यावर्षी सुरु झालेल्या दारिदय रेषेखालील उत्पन्न गटासाठी सुरु करण्यात आलेल्या अनुभूती इंग्लिश स्कूल क्र. २ चे चिमुकले विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

पोळ्याचे ठरलेले कार्यक्रम आटोपल्यावर जैन हिल्स येथे विदेशी पाहुण्यांसह आदरणीय भवरलालजी जैन यांनी उपस्थितांसमोर आपले विचार व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आपल्या भारतात शेती आणि बैल यांचे नाते टिकून आहे. विदेशात यांत्रिक पद्धतीने शेती केली जाते परंतु भारतात अल्पभूधारक शेती असल्यामुळे आजही बैलांच्या मदतीने शेतीची कामे करण्यात येतात. माझा जन्म वाकोद सारख्या छोट्या गावात झाला त्यामुळे बैल, शेतकरी आणि त्यांच्या अडचणी मला ठाऊक आहेत. मलाही यांत्रिक पद्धतीने शेती करणे सहज शक्य आहे परंतु सालदार, बैल पाहिल्याशिवाय समाधान वाटत नाही. त्यामुळे बैल, सालदार आणि शेती यांचे नाते घट्ट झाले आहे. भवरलालजी जैन यांच्या संबोधनानंतर त्यांच्याहस्ते एकूण ४५ सालदार आणि त्यांच्या सौभाग्यवतींना भेटवस्तू, कपडा, साडी-चोळी देऊन गौरविण्यात आले. याच बरोबर ३८ ट्रॅक्टर व वाहन चालकांचाही भेटवस्तू, टोपी, कपडा देऊन विदेशी पाहुणे, मान्यवर तसेच सौ. ज्योती जैन, सौ. निशा जैन यांच्याहस्ते देखील त्यांच्या घरधणीनींचा सत्कार केला गेला. यानंतर सालदारांना मिष्टांन्न देण्यात आले. यावेळी वाढण्याचे काम फार्म सुपरवायझर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ अनिल ढाके, विजयसिंग पाटील, कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे गौतम देसर्डा, एम.पी. बागुल, एस.बी. ठाकरे, एम.बी. खंबायत, बी.डी. पाटील, शशिकांत संत, एस. पी. पाटील यांनी परिश्रम घेतले.

***